2 7 MAR 2017
लोकमत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पारंपरिक अभ्यासक्रमात शिक्षकांनी अडकू नये

## कोत्तापल्ले : डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मराठी विभागात राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : सध्या ज्ञानाचा गतिमान पद्धतीने विकास होतो आहे. सर्व ज्ञानशाखा परस्परांशी सम्मीलित होऊन त्यातून पुन्हा नवीन ज्ञानशाखा उदयास येत आहेत. अशा परिस्थितीत पारंपरिक अभ्यासक्रम आणि अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांनी अडकून राहता कामा नये, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन या सभागृहात मराठी अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्यातर्फे डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, सद्य:स्थितीत ज्ञानविस्तार हा प्रचंड गतीने आणि अनेक दिशांनी होतो आहे. या परिस्थितीत केवळ मराठीच नव्हे, तर सर्वच विषयांच्या अध्यापनासंदर्भात नव्याने विचार व मांडणी करण्याची गरज आहे.

डॉ. ठाकूर म्हणाले, मराठीसह अन्य भाषाविषयांबाबत वाढते औदासिन्य चिंताजनक आहे. काळाच्या मागण्या सातत्याने बदलताहेत. त्या मागण्यांची पूर्तता करण्याचे आणि त्यांना सामोरे जाणारी पिढी घडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात अन्य संस्थानिक व राजे अरबी, उर्दू, फारसी भाषांच्या प्रभावाखाली असताना आपला पत्रव्यवहार मराठीतून करण्यास प्राधान्य दिले. हा आदर्श समोर ठेवून आपण मराठीतून व्यवहारास प्राधान्य द्यायला हवे.

यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर शिवकुमार सोनाळकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

2 7 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे ब्रँड ॲम्बेसॅडर बनावे

## केनिया एज्युकेशन कौन्सिलर महंमद अली यांची अपेक्षा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनी आपल्या देशात परतल्यानंतर या विद्यापीठाचे व भारतीय उच्चशिक्षणाचे ब्रँड ॲम्बेसॅडर बनावे, अशी अपेक्षा नवी दिल्ली येथील केनिया हाय कमिशनचे एज्युकेशन कौन्सिलर महंमद अली ओस्मान यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स कक्षातर्फे नुकतीच 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषद' घेण्यात आली. या परिषदेत विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विविध देशांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

महंमद अली म्हणाले, विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षणाची परंपरा आणि आस्था पाहून मी भारावून गेलो आहे. भारतीय उच्चशिक्षण परंपरेबद्दल माझ्या मनात आदराचे स्थान निर्माण झाले आहे. परदेशी विद्यार्थ्यांना, विशेषतः केनियासारख्या देशांतल्या विद्यार्थ्यांना परवडणारे शिक्षण या ठिकाणी दिले जाते, याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन मायदेशी परतल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांनाही योग्य मार्गदर्शन करून, भारतात उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, हे सारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाचे ब्रँड ॲम्बेसॅडर आहेत, ही बाब खरी आहेच. पण, त्याचबरोबर स्थानिक पालक या नात्याने त्यांच्याशी सुसंवाद करून, त्यांच्या समस्या, प्रश्न समजून घेऊन त्या सोडविण्यास प्राधान्य देणे, ही बाब अशा परिषदांतून शक्य होते. या दरम्यान विद्यापीठ परिक्षेत्रातील अभ्यास भेटी दिल्या. परिषदेत केनिया, झांबिया, तांझानिया, युगांडा, दक्षिण सुदान, सोमालीया देशांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

'27 MAR 2017 **पुढारी**

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**गडहिंग्लज : विदेश मंत्रालयाचे सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा नागरी सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. यावेळी उपस्थित डॉ. डी. आर. मोरे, एम. आर. रेडेकर व अन्य.**

# करिअरच्या वेगळ्या वाटा निवडा : डॉ. मुळे

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

करिअरच्या पारंपरिक वाटेने जाण्याची मानसिकता बदलून वेगळ्या वाटा निवडा. यशाच्या उंच शिखरावर जाण्यापासून आपणाला कुणीही रोखू शकणार नाही. मात्र, या वाटा निवडताना जीवनात गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, ही गोष्ट विसरू नका, असे प्रतिपादन भारताचे परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले. ते गडहिंग्लज येथे आयोजित नागरी सत्कार व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते.

गडहिंग्लज तालुका गणित -विज्ञान अध्यापक संघटनेच्या वतीने परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्रास्ताविक मारुती रेडेकर यांनी केले. अतिथी परिचय बाळासाहेब मुल्ला यांनी करून दिला. आदिती मूर्ती यांच्यासह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास डी. आर. मोरे, प्रा. सुनील शिंत्रे, बी. जी. काटे, डॉ. व्ही. एन. शिंदे, राजेंद्र गड्ड्याणवर, संपत देसाई, शिवाजी रेडेकर, एन. बी. मासाळ, सूत्रसंचालन दास यांनी केले. माजी नगराध्यक्ष राजेंद्र मांडेकर यांनी आभार मानले.

2 7 MAR 2017

सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेगळ्या वाटा शोधा, असामान्य करिअर करा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : गडहिंग्लजमध्ये गणित-विज्ञान अध्यापक संघटनेतर्फे नागरी सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २६ : वर्षानुवर्षाचा घोकंपट्टीचा पायंडा तोडा. ज्ञानाच्या नवीन पायवाटा विकसित करा. करिअर म्हणजे नोकरी नव्हे, तर ते एक जीवन बदलण्याचा मार्ग आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजेच जीवनाचा एकमेव महामार्ग नव्हे. यशाकडे जाणाऱ्या अनेक वाटा आहेत. तरुण-तरुणींनी म्हणूनच या वेगळ्या वाटा धुंडाळल्या पाहिजेत. त्यातूनच असामान्य व्यक्तिमत्त्व, करिअर घडत असते, असे प्रतिपादन देशाचे परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी आज येथे केले.

### वक्तृत्व स्पर्धाच उत्पन्नाचे साधन...

**डॉ. मुळे म्हणाले, "आम्ही महाविद्यालयात होतो, तेव्हा पॉकिटमनी म्हणजे काय माहीत नव्हते; परंतु त्यावेळी वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेऊन मिळालेले रोख बक्षीस आमच्या दृष्टीने उत्पन्नाचे साधन होते. या उत्पन्नातूनच आम्ही महिन्याचा खर्च भागवायचो. यासाठी आम्ही स्पर्धांची वाटच पाहायचो. आयुष्यातील प्रत्येक यशामागे अशीच एक छोटी कथा घडत गेली."**

डॉ. मुळे सत्कार समिती व गडहिंग्लज तालुका गणित-विज्ञान अध्यापक संघटनेतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. मुंबईच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाने डी.लिट. पदवीने सन्मान केल्याबद्दल डॉ. मुळे यांचा डॉ. शिंदे यांच्या हस्ते नागरी सत्कार झाला. सत्कार समितीचे अध्यक्ष एम. आर. रेडेकर, डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले सुरेश पाटील व बाळकृष्ण खणदाळे यांचा गौरव झाला. मराठा चित्रमंदिरात हा कार्यक्रम झाला.



**गडहिंग्लज : परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा शनिवारी नागरी सत्कार करताना डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, एम. आर. रेडेकर आदी.**

सत्कार समितीचे अध्यक्ष एम. आर. रेडेकर यांनी प्रास्ताविक केले. बाळासाहेब मुल्ला यांनी परिचय करून दिला. अशोक भोईटे, आदिती मूर्ती यांची भाषणे झाली. प्रा. एन. बी. मासाळ व अमृतमहोत्सवानिमित्त श्री. रेडेकर यांचा सत्कार झाला. सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र मांडेकर यांनी आभार मानले. सत्कार समितीचे तुषार रेडेकर, श्री. मांडेकर व सहकाऱ्यांनी संयोजन केले.

27 MAR 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करिअर ही समाज बदलण्याची संधी

**म. टा. वृत्तसेवा, गडहिंग्लज**



'आपल्या बहुसंस्कृत समाजामध्ये करिअरच्या अनके संधी उपलब्ध आहेत. फक्त करीअरकडे वेगळ्या पद्धतीने पाहण्याची गरज आहे. माणूस हा कणाकणातून बनतो. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंग, प्रत्येक व्यक्ती त्याला घडवत असते. त्यामुळे तीळ तीळ एकत्र करून तिलोत्तमा बनण्याचा प्रयत्न करा,' असा सल्ला परराष्ट्र खात्यातील सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी दिला.

गडहिंग्लज तालुका गणित-विज्ञान अध्यापक संघटना व सत्कार समितीमार्फत डॉ. मुळे यांचा डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ (मुंबई) यांच्यावतीने डी.लिट पदवी मिळाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ.मुळे म्हणाले, 'आज स्पर्धा परीक्षेचे बाजारीकरण झाले आहे. म्हणूनच फक्त स्पर्धात्मक परीक्षा, पदवी हे जीवनाचे अंतिम ध्येय नाही. जीवन त्याहूनही विशाल आहे. वेगळ्या वाटा धुंडाळता आल्या पाहिजेत. राजकारणापासून ते जवळपास सर्वच क्षेत्रात करिअरची संधी आज उपलब्ध आहे. करीयर ही समाज बदलण्याची संधी असते. आपण करत असलेल्या कामाबद्दल आपल्या संस्कृतीबद्दल सार्थ अभिमान ठेवला पाहिजे. अपयशाची भीती बाळगण्याची गरज नाही पण संकुचित अपेक्षा बाळगू नका. छत्रपती शिवाजी महाराज, मदर तेरेसा, शाहू महाराज यांचा करिअरसाठी अभ्यास करा. करीअर ही समस्या होऊच नये कारण समस्येमधूनच करिअर घडते.'

**डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांचा गडहिंग्लजमध्ये नागरी सत्कार**

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ.शिंदे म्हणाले, 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी केवळ स्पर्धा परीक्षा हा एकमेव महामार्ग नाही. क्षमता नसेल तर रात्रंदिवस मेहनत घेऊनही यश मिळेलच असे नाही. छोट्या-छोट्या पायवाटासुद्धा यशाचा मार्ग दाखवतात. म्हणूनच आपल्यातील त्रुटी व मर्यादा ओळख व लहान वाटेचा सुद्धा तितक्याच गांभीर्याने विचार करा. आपले आदर्श आपल्या सभोवतालीच असतात ते ओळखण्याची क्षमता आपल्यात असायला हवी.' यावेळी अशोक भोईटे व अदिती मोर्ती यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ.शिंदे यांच्या हस्ते डॉ. मुळे यांचा स्मृतीचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष रामकुमार सावंत यांनी फेटा देऊन डॉ.मुळे यांचा सत्कार केला.यावेळी प्राचार्य जे.बी. बारदेस्कर, प्रा.किसानराव कुराडे, ॲड. श्रीपतराव शिंदे, ॲड.अण्णासाहेब चव्हाण, राजेंद्र गड्यांनावर, प्रा.सुनील शिंत्रे, श्रद्धा शिंत्रे आदी मान्यवरांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समितीचे अध्यक्ष एम.आर.रेडेकर यांनी स्वागत केले. गडहिंग्लज तालुका गणित-विज्ञान अध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रा.बाळासाहेब मुल्ला यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा.सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. माजी नगराध्यक्ष राजेंद्र मांडेकर यांनी आभार मानले.